लोकमत

# सायबर सुरक्षिततेबाबत कार्यशाळा संपन्न

**खंडाळा :** संत गाडगे महाराज कनिष्ठ महाविद्यालय येथे नुकतीच सायबर सुरक्षिततेबाबत कार्यशाळा कार्यक्रम संपन्न झाली.

अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू, भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सुमित संजय सपकाळ व अनिकेत भुडके या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेबाबत ऑनलाइन फसवणूक, वाढता सोशल मीडियाचा वापर, त्यामधून होणारी फसवणूक या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सरकटे होते. क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी शिक्षक गावंडे, भाकरे, ब्राह्मणे, रेखाते, डॉ. विजेंद्र तायडे व विद्यार्थी, कर्मचारी आदी उपस्थित होते.



Hello Akola Gramin
Page No. 2 Oct 31, 2023
Powered by: erelego.com